**पुणे महानगरपालिका.**

जाहिरात प्रकटन,

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील विविध गटातील उमेदवारांची खालील पदांसाठी निवडयादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ क्र | पदनाम | वेतन श्रेणी | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य लेखापाल (अ) | रु.१०६५० ते २२१५० + मान्य भत्ते | चार्टर्ड अकौंटंट आणि ५ वर्षाचा शासकिय कामाचा अथवा स्वतंत्र व्यवसायाचा अनुभव आवश्यक .<br>किंवा<br>मान्य विद्यापिठाचा एम.कॉम. (अकौंट्स) द्वितीय श्रेणी पदवीका धारक आणि १० वर्षाचा हिशोबी व शासकिय कामाचा अनुभव आवश्यक . | १ | सर्वसाधारण | मुख्य लेखापाल कार्यालय | |
| २ | सांख्यिकी व संगणक प्रमुख (अ) | रु.१०६५० ते २२१५०+ मान्य भत्ते. | १) मान्य विद्यापीठाची शास्त्र शाखेकडील संख्या शास्त्र विषय घेऊन किमान द्वितीय श्रेणीतील पदवीधारक.<br>२) सरकारमान्य तांत्रिक प्रशिक्षण संस्था किंवा विद्यापीठ यांचेकडील कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मधील पदव्युत्तर पदवी/पदवीधारक.<br>३) संगणक क्षेत्रातील सांख्यिकी कामाचा शासकीय, निमशासकीय अथवा खासगी संस्थेमधील कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य. | १ (निवड यादी) | सर्वसाधारण | सांख्यिकी व संगणक विभाग | |
| ३ | सिस्टिम मॅनेजर (ई-प्रशासन) (अ) | रु.१०६५० ते १५८५०+ मान्य भत्ते | बी.ई./बी.टेक. इन इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन/बी.ई इलेक्ट्रॉनिक्स/कॉम्प्युटर सायन्स/कॉम्प्युटर इंजिनिअर किमान ३ वर्षाचा सरकारी / निमसरकारी अथवा नामांकित मान्यताप्राप्त संस्थेतील विशेषत: ERP/SAP कामाचा अनुभव आवश्यक. | १ (निवड यादी) | सर्वसाधारण | सांख्यिकी व संगणक विभाग | |
| ४ | मुख्य सुरक्षा अधिकारी (अ) | रु.१०००० ते २०२५० + मान्य भत्ते | अ) मान्य विद्यापीठाचा पदवीधर,<br>ब) कायद्याच्या पदवीधरास तसेच कामगारविषयक कायद्याची माहिती असण्याच्या दृष्टीने त्यातील पदविका धारकाला प्राधान्य.<br><u>इतर पात्रता</u><br>अ) सुरक्षा अधिकारी म्हणून कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>ब) सेनादलातील कमिशन ऑफिसरच्या जागेवरील कामाचा ५ वर्षांचा अनुभव.<br>विशेष सुचना : सेना दलातील निवृत्त अगर अनुभवी अधिकारी सदर जागेवरील नेमणूकीसाठी पात्र ठरल्यास अशा अधिकाऱ्यास उपरोक्त शैक्षणिक पात्रतेची व वयाच्या बंधनाची अट आवश्यकतेनुसार मा.महापालिका आयुक्त हे शिथिल करतील. | १ | सर्वसाधारण | उप आयुक्त, (झोन) कार्यालय | |
| ५ | उप मुख्य लेखापाल (अ) | रु.१०००० ते २०२५० + मान्य भत्ते | सी.ए. किंवा आय.सी.डब्ल्यु.ए. किंवा सी.एस, संगणकाचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक. | १ (निवड यादी) | १ अजा | मुख्य लेखापाल कार्या | |
| ६ | क्षेत्रिय अधिकारी (अ) | रु.८००० ते १३५०० + मान्य भत्ते | **अ)** इंजिनिअरींगमधील पदवीधर : बी.ई.(सि.) अथवा कोणत्याही शाखेचा पदवीका/पदविधारक असावा व कनिष्ठ अभियंता व त्यावरील पदाच्या कामाचा किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>**ब)** इंजिनिअरींगमधील पदविकाधारक : डी.सी.ई./ डी.ई.ई. या कनिष्ठ अभियंता व त्यावरील पदाच्या कामाचा किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>**क)** एम.बी.बी.एस. वैद्यकीय क्षेत्रातील उमेदवाराचा क्षेत्रिय अधिकारी या पदाकरीता विचार करण्यात येणार नाही.<br>**ड)** इतर शाखांचे पदविधर-सिनिअर ग्रेड लेखनिक अगर वरिष्ठ संवर्गातील किमान १० वर्षांचा कामाचा अनुभव आवश्यक या शिवाय मनपा व संलग्न संस्थामधील पदव्युत्तर (पोस्ट ग्रॅज्युएट) शैक्षणिक पात्रताधारक सेवकांनी त्यांनी पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या दिनांकापासूनचा कालावधी हा त्याचे १० वर्षाच्या अनुभवासाठी ग्राह्य धरणेत येईल. | १ | सर्वसाधारण | क्षेत्रिय कार्यालये | |

| अ क्र | पदनाम | वेतन श्रेणी | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | सुरक्षा अधिकारी (ब) | रु.६५०० ते १४७५० + मान्य भत्ते | अ) मान्य विद्यापीठाचा पदवीधर,<br>ब) कायद्याच्या पदवीधरास तसेच कामगारविषयक कायद्याची माहिती असण्याच्या दृष्टीने त्यातील पदविका धारकाला प्राधान्य.<br>**इतर पात्रता**<br>अ) सुरक्षा अधिकारी म्हणून कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>ब) सेनादलातील कमिशन ऑफिसरच्या जागेवरील कामाचा ५ वर्षांचा अनुभव.<br>विशेष सुचना : सेना दलातील निवृत्त अगर अनुभवी अधिकारी सदर जागेवरील नेमणूकीसाठी पात्र ठरल्यास अशा अधिकाऱ्यास उपरोक्त शैक्षणिक पात्रतेची व वयाच्या बंधनाची अट आवश्यकतेनुसार मा.महापालिका आयुक्त हे शिथिल करतील. | १ | सर्वसाधारण | उप आयुक्त, (जिंघ) कार्यालय | |
| ८ | क्युरेटर (ब) | रु.६५०० ते १०५०० + मान्य भत्ते | वाईल्ड लाईफ मॅनेजमेंटची पदवी व ५ वर्षांचा अनुभव | १ | सर्वसाधारण | उद्यान कार्यालय | |

## अटी:-

१) **वयोमर्यादा** :-

**(अ)** वरील पदांसाठी जाहिरातीच्या दिनांकास किमान वय १८ वर्षे पुर्ण असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम राहील).

**(ब)** माजी सैनिक/प्रकल्प ग्रस्त/भुकंप ग्रस्त यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**(क)** स्वातंत्र सैनिक नामनिर्देशित पाल्य/खेळाडू (५) वर्ष/जनगनना कर्मचारी इत्यादींसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

**(ड)** आधीच पुणे महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या उमेदवारास कमाल वयाची अट लागु होणार नाही.

२) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

**३) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.**

४) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०९३/प्र.क्र.३६६/का-२ दि. २२/६/९४ महिलांसाठी असणारे आरक्षण अनुज्ञेय राहील.

५) शासन आदेशानुसार प्रकल्प ग्रस्तांसाठी आवश्यक असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील. शासन परिपत्रक क्रं. न्यायप्र-१००८/७/प्र.क्र.५८/०८/(भाग-२)/१६-अ दि. १८/०७/२००८ नुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवेतील गट '' क '' व गट '' ड '' मधील पदांवर आरक्षण अनुज्ञेय राहील . पुणे जिल्ह्यातील टेमघर प्रकल्पग्रस्त असल्यास प्राधान्य.

६) शासन आदेशानुसार माजी सैनिक, खेळाडू, अपंग यांचेसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील.

७) शारिरीक अपंग व्यक्तीसाठी राखीव पदावरील नियुक्ती संबंधित प्रवर्गाचे किमान ४०% अपंगत्वाचे संबंधित जिल्ह्याच्या शासकिय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकिय तज्ञाने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.

८) वरील अ.क्र.३ येथील पदासाठी दिनांक ०७/०८/२००१ व दिनांक २०/०७/२००२ व आजपर्यंतच्या सर्व शासन निर्णयान्वये DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर, किंवा A स्तर, किंवा B स्तर, किंवा C स्तर, किंवा MS-CIT परिक्षा नेमणूक झाल्यापासून २ वर्षात उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

९) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णयानुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१०) अंशकालीन कर्मचाऱ्यांची, त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक आहे. तसे केल्याचे पुरावे अर्जासोबत जोडावेत. तसेच उमेदवार माजी सैनिकांचे वारस असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत करून अर्जासोबत जोडावीत. भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११) माजी सैनिकांच्या समांतर आरक्षणामध्ये युध्दात /सैन्य दलातील सेवेत मृत्यु पावलेल्या किंवा अपंग झालेल्या सैनिकांच्या वारसास प्राधान्य दिले जाईल. त्यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नाव नोंदणी केल्याचे नोंदणीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**१२) खुल्या गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रु.१००/- किमतीचे व आरक्षीत गटासाठी अर्ज करणाऱ्या मागसवर्गीय उमेदवारांना रु. ५०/- किमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा. महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली १) मा.उप आयुक्त क्र.१. घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय, घोलेरोड मनपा मुद्रणालया समोर,पुणे ४, २) मा.उप आयुक्त क्र.२. ढोलेपाटीलरोड क्षेत्रिय कार्यालय, ढोलेपाटील मार्केट इमारत, पुणे १.३) मा.उप आयुक्त क्र.३.- टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय,९९०,शुक्रवारपेठ,शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड, पुणे ३०.,४) मा.उप आयुक्त क्र.४- टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय,९९० शुक्रवारपेठ, शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड, पुणे ३० येथे दि.१८/१२/२००८ ते दि.३१/१२/२००८ अखेर (पर्यंत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.**

**१३) वरील सर्व पदांसाठीचे अर्ज सेवकवर्ग विभाग, मनपा मुख्य इमारत , खोली नं. २४०, दुसरा मजला, शिवाजीनगर पुणे ०५ येथे दिनांक ०१/०१ /२००९ अखेर सायं ५:०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.**

**१४) वरील सर्व पदांसाठी पात्र होणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखाती दि. ०७/०१/२००९ रोजी सकाळी ९:०० वा. पासून घेण्यात येतील व त्याबाबत मुलाखतीची पत्रे पात्र उमेदवारांना अलहिदा पाठविण्यात येतील.**

१५) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (ट्रु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अशा अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**१६) वरील पदांवर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहील.**

१७) आरक्षीत पदांकरीता निवड झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र शासन नियमाप्रमाणे विहीत मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द ठरविण्यात येईल.

१८) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

१९) उमेदवार सरकारी / निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खाते प्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

२०) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२१) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

२२) महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२३) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी अपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्त समाप्त करण्यात येईल.

२४) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर व्ही २०००/प्र.क्र. १७/२०००/१२ दि.१/७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि.२८/३/२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**सही/-**
**अति महापालिका आयुक्त (वि.)**
**पुणे महानगरपालिका.**

## पुणे महानगरपालिका.

जाहिरात प्रकटन,

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील विविध गटातील उमेदवारांची खालील पदांसाठी निवडयादी /प्रतिक्षायादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | वेतन श्रेणी | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सोनोलॉजिस्ट (अ) | रु.१०००० ते २०२५० + मान्य भत्ते | एम.डी. (रेडिओलॉजिकल डायग्नॉसिस) | १ | सर्वसाधारण | आरोग्य कार्यालय | |
| २ | ज्युनिअर लिगल असिस्टंट (अ) | रु.१०००० ते २०२५० + मान्य भत्ते | कायद्याचा पदवीधर आणि किमान ७ वर्षाचा लीगल प्रॅक्टीसचा अनुभव , अॅडव्होकेटची सनद घेतली असणे आवश्यक आहे. | १ | सर्वसाधारण | विधी सल्लागार कार्यालय | |
| ३ | वैद्यकिय अधिकारी (ब) | रु.८००० ते १३५०० + मान्य भत्ते | एम.बी.बी.एस. उत्तीर्ण तसेच एम.डी. (स्त्री रोग व प्रसुती शास्त्र ) अथवा डि.जी.ओ. ही शैक्षणिक पात्रता असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य | ५ | इमाव | आरोग्य कार्यालय | |
| ४ | संगणक प्रोग्रॅमर | रु.५५०० ते १२८५०+ मान्य भत्ते. | मान्य विद्यापीठाची कॉम्प्युटर सायन्समधील पदवी व ऑपरेटिंग कॉम्प्युटरचा चार वर्षांचा अनुभव या शिवाय कॉम्प्युटर मधील फॉक्सबेस, फॉक्सप्रो, सॉफ्टवेअर व लॅन/युनिक्स ऑपरेटिंग सिस्टिम<br>**अथवा**<br>मान्य विद्यापीठाची पदवी, शासकीय मान्यताप्राप्त असलेल्या इन्स्टिट्यूट मधील कमीत कमी सहा महिने शिक्षण घेतलेली कॉम्प्युटर पदविका. कॉम्प्युटर हाताळण्याचा प्रत्यक्षात घेतलेला अनुभव आणि फॉक्सबेस, फॉक्सप्रो, सॉफ्टवेअर व लॅन/युनिक्स ऑपरेटिंग सिस्टिम, पॅकेजिंग इ. हाताळण्याचा अनुभव. | १ | अनुसूचित जमाती | सांख्यिकी व संगणक विभाग | |
| ५ | कनिष्ठ अभियंता (सिव्हिल) (क) | रु.५५०० ते ९००० + मान्य भत्ते | बी.ई.(सिव्हिल) अगर मान्य विद्यापीठाचा तत्सम पदवीधर अगर डी.सी.ई.किंवा सरकारमान्य इन्स्टिट्युटची सिव्हिल इंजिनिअरींग परिक्षा उत्तीर्ण.<br>**इतर पात्रता:-** सरकारी/ निमसरकारी अगर मोठ्या संस्थेतील कामाचा पूर्वानुभव असणाऱ्यास प्राधान्य. | २५ | अजा-४<br>अज-२<br>विजाअ-३<br>भजब-१<br>भजक-२<br>खुला-१३ | पुणे मनपाकडील विविध खाती | |
| ६ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) (क) | रु.५५०० ते ९००० + मान्य भत्ते | बी.ई.(इलेक्ट्रीकल) अगर मान्य विद्यापीठाचा तत्सम पदवीधर अगर डी.ई.ई.किंवा सरकारमान्य इन्स्टिट्युटची इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग परिक्षा उत्तीर्ण.<br>**इतर पात्रता:-** सरकारी/ निमसरकारी अगर मोठ्या संस्थेतील कामाचा पूर्वानुभव असणाऱ्यास प्राधान्य. | ४ | अजा-१<br>भजड-१<br>खुला-२ | पुणे मनपाकडील विविध खाती | |
| ७ | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) (क) | रु.५५०० ते ९००० + मान्य भत्ते | बी.ई.(मेकॅनिकल) अगर मान्य विद्यापीठाचा तत्सम पदवीधर अगर डी.एम.ई.किंवा सरकार मान्य इन्स्टिट्युटची मेकॅनिकल इंजिनिअरींग परिक्षा उत्तीर्ण.<br>**इतर पात्रता:-** सरकारी/ निमसरकारी अगर मोठ्या संस्थेतील कामाचा पूर्वानुभव असणाऱ्यास प्राधान्य. | २ | विजाअ-१<br>खुला-१ | पुणे मनपाकडील विविध खाती | |
| ८ | समाजसंघटक (क) | रु.५३०० ते ११८०० + मान्य भत्ते | मान्यता प्राप्त विद्यापिठाची मास्टर ऑफ स्पेशल वर्क (एम.एस.डब्ल्यु) ही पदवी उत्तीर्ण, अर्बन कम्युनिटी ऑर्गनायझेशन कामाचा (पुणे मनपा नागरवस्ती विकास योजना विभागाकडील समाजसेवक या पदावरील) ५ वर्षांचा अनुभव. | १ | खुला | | |
| ९ | हॉर्टीकल्चरल सुपरवायझर (क) | रु.५००० ते ८००० + मान्य भत्ते | १) बी.एस्सी. (अॅग्रीकल्चरल)<br>२) अनुभवी उमेदवारास प्राधान्य | २ | विजाअ-१<br>खुला-१ | उद्यान कार्यालय | |
| १० | ज्युनिअर नर्स (क) | रु.४५०० ते ७००० + मान्य भत्ते | नर्सिंग कौन्सिलमधील सभासदत्व नोंदविलेला फुलट्रेंड नर्सचा कोर्स (जनरल नर्सिंग अँड मिडवायफरी कोर्स) उत्तीर्ण. | ५ | अज | आरोग्य कार्यालय | |
| ११ | पेव्हर ड्रायव्हर (क) | रु.३१५० ते ७३०० + मान्य भत्ते | एस.एस.सी अगर तत्सम परिक्षा उत्तीर्ण (मनपा सेवकांसाठी शिथिलक्षम) पेव्हर ड्रायव्हर कामाचा ३ वर्षांचा अनुभव चाचणी परीक्षा देणे आवश्यक | २ | विमाप्र-१<br>अज-१ | पथ विभाग | |

| अ. क्र. | पदनाम | वेतन श्रेणी | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | ज्युनिअर ग्रेड लेखनिक (क) | रु.३०५० ते ७१५०+ मान्य भत्ते. | एस.एस.सी अगर तत्सम परिक्षा किमान ४५% गुण मिळवून उत्तीर्ण , शासनमान्य मराठी टंकलेखन ३० श. प्र. मि. परिक्षा उत्तीर्ण (म.न.पा.सेवकांसाठी गुणांची टक्केवारीची अट लागू नाही)<br>प्राधान्य:- १) पदवीधर शास्त्र , वाणिज्य आणि कला<br>२) ॲडव्हान्स डिप्लोमा इन कॉम्प्युटर सॉफ्टवेअर व सिस्टीम ॲनॅलिसिस- मान्य विद्यापीठाचा १ वर्षाचा कोर्स उत्तीर्ण अथवा डिप्लोमा इन कॉम्प्युटर मॅनेजमेंट- मान्य विद्यापीठाचा १ वर्षाचा कोर्स उत्तीर्ण. | ३५ निवड यादी,<br><br>२४ प्रतिक्षा यादी | अजा - २ अज - १२ इमाव - २१<br><br>अजा - ५ इमाव - ९ खुला - १० | पुणे मनपाकडील विविध खाती | |
| १३ | मोटार सारथी (क) | रु.३०५० ते ७१५०+ मान्य भत्ते. | इ.४ थी पास. जड वाहन चालविण्याचा परवाना. वाहन चालविण्याचा ३ वर्षांचा अनुभव. | ३ | अजा - ३ | व्हेईकल डेपो | |
| १४ | सुतार (ड) | रु.२९५५ ते ५९६० + मान्य भत्ते | मराठी ७ वी उत्तीर्ण असणे आवश्यक , सुतार कामाचा शासकिय कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक . | २ | भजक - १ भजड - १ | भवन कार्यालय | |
| १५ | दुरध्वनी परिचर (ड) | रु.२९५५ ते ५९६० + मान्य भत्ते | एस. एस.सी. परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्कय व शासनमान्य टेलिफोन ओपरेटर कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक. | २ | विजाअ- १ इमाव - १ | दुरध्वनी खाते | |
| १६ | माहूत (ड) | रु.२८८० ५७८० + मान्य भत्ते | साक्षर, हत्तीबाबतची संपूर्ण माहिती असणे आवश्यक. | १ | खुला | उद्यान कार्यालय | |
| १७ | ॲम्ब्युलन्स ॲटेंडन्ट (ड) | रू. २८८० ते ५७८० + मान्य भत्ते. | साक्षर,निकोप प्रकृती,निर्व्यसनी प्रसंगी गाडी चालविता येणे आवश्यक ( गाडी मशिन प्राथमिक माहिती.) | २ | विआज- १ भजक -१ | आरोग्य कार्यालय | |

## अटी:-

१) <u>वयोमर्यादा</u> :-

**(अ)** पदासाठी दि. ०१ नोव्हेंबर २००८ दिनांकास किमान वय १८ वर्षे पुर्ण असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम राहील).

**(ब)** माजी सैनिक/प्रकल्प ग्रस्त/भुकंप ग्रस्त यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**(क)** स्वातंत्र सैनिक नामनिर्देशित पाल्य/खेळाडू (५) वर्ष/जनगनना कर्मचारी इत्यादींसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

**(ड)** आधीच पुणे महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या उमेदवारास कमाल वयाची अट लागु होणार नाही.

२) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

**३) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.**

४) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०९३/प्र.क्र.३६६/का-२ दि. २२/६/९४ महिलांसाठी असणारे आरक्षण अनुज्ञेय राहील.

५) शासन आदेशानुसार प्रकल्प ग्रस्तांसाठी आवश्यक असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील. शासन परिपत्रक क्रं. न्यायप्र-१००८/७/प्र.क्र.५८/०८/(भाग-२)/१६-अ दि. १८/०७/२००८ नुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवेतील गट " क " व गट " ड " मधील पदांवर आरक्षण अनुज्ञेय राहील . पुणे जिल्ह्यातील टेमघर प्रकल्पग्रस्त असल्यास प्राधान्य.

६) शासन आदेशानुसार माजी सैनिक, खेळाडू, अपंग यांचेसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील.

७) शारिरीक अपंग व्यक्तीसाठी राखीव पदावरील नियुक्ती संबंधित प्रवर्गाचे किमान ४०% अपंगत्वाचे संबंधित जिल्ह्याच्या शासकिय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकिय तज्ञाने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.

८) वरील अ.क्र.३ येथील पदासाठी दिनांक ०७/०८/२००१ व दिनांक २०/०७/२००२ व आजपर्यंतच्या सर्व शासन निर्णयान्वये DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर, किंवा A स्तर, किंवा B स्तर, किंवा C स्तर, किंवा MS-CIT परिक्षा नेमणूक झाल्यापासून २ वर्षात उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

९) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णयानुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१०) अंशकालीन कर्मचाऱ्यांची, त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक आहे. तसे केल्याचे पुरावे अर्जासोबत जोडावेत. तसेच उमेदवार माजी सैनिकांचे वारस असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत करून अर्जासोबत जोडावीत. भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

११) माजी सैनिकांच्या समांतर आरक्षणामध्ये युध्दात /सैन्य दलातील सेवेत मृत्यु पावलेल्या किंवा अपंग झालेल्या सैनिकांच्या वारसास प्राधान्य दिले जाईल. त्यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नाव नोंदणी केल्याचे नोंदणीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**१२) खुल्या गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रु.१००/- किमतीचे व आरक्षीत गटासाठी अर्ज करणाऱ्या मागसवर्गीय उमेदवारांना रु. ५०/- किमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा. महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली १) मा.उप आयुक्त क्र.१. घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय, घोलेरोड मनपा मुद्रणालया समोर,पुणे ४, २) मा.उप आयुक्त क्र.२. ढोलेपाटीलरोड क्षेत्रिय कार्यालय, ढोलेपाटील मार्केट इमारत, पुणे १.३) मा.उप आयुक्त क्र.३.- टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय,९९०,शुक्रवारपेठ,शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड, पुणे ३०.,४) मा.उप आयुक्त क्र.४- टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय,९९० शुक्रवारपेठ, शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड, पुणे ३० येथे दि. १८/१२/२००८ ते दि.०१ /०१ /२००९ अखेर (पर्यंत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील व दि.०२ /०१/२००९ दुपारी ४.०० पर्यंत स्विकारले जातील. सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.**

१३) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (ट्रु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अशा अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**१५) वरील पदांवर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहील.**

१६) आरक्षीत पदांकरीता निवड झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र शासन नियमाप्रमाणे विहीत मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द ठरविण्यात येईल.

१७) अनुसुचित जमातीच्या गटातील उमेदवारांनी अर्जासोबत जात पडताळणी प्रमाणपत्र (cast validity certificate) जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा अर्ज पात्र ठरविला जाणार नाही.

१८) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

१९) उमेदवार सरकारी / निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खाते प्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

२०) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२१) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

२२) महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२३) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी अपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्त समाप्त करण्यात येईल.

२४) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर व्ही २०००/प्र.क्र. १७/२०००/१२ दि.१/७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि.२८/३/२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**सही/-**
**अति महापालिका आयुक्त (वि.)**
**पुणे महानगरपालिका.**